**प्रेसनोट** **दिनांक ०९/०३/२०१९**

## डेक्कन पोलीस स्टेशन

## प्रभात बीट मार्शल यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचुन जेष्ठ नागरीकाला केली मदत

दिनांक ०४/०३/२०१९ रोजी पोलीस हवालदार ३०२८ पवार व पोलीस नाईक ११६९ चव्हाण यांना प्रभात बीट मार्शल ड्युटी असताना सकाळी ०८/३० वा. चे सुमारास प्रबोधन हौसींग सोसायटी प्रभात रोड गल्ली नं.१४ पुणे येथे पोलीस मदतीची तात्काळ गरज आहे असे ठाणे अंमलदार डेक्कन यांनी कळविल्याने बीट मार्शल सदर ठिकाणी पोहोचले. सदर ठिकाणी एक जेष्ठ नागरीक वय ७५ वर्षे हे झोपेत असताना बेडवरुन खाली पडल्याने त्यांना उठता येत नव्हते. फ्लॅटचा दरवाजा आतुन बंद असल्याने तात्काळ अग्निशामक दल बोलावुन खिडकेचे गज तोडुन आत जावुन जेष्ठ नागरीक यांना शेजारील विनायक महादेव नातु यांचे ताब्यात देण्यात आले.

सदर बाबत सोसायटी मधील लोकांनी प्रभात बीट मार्शल तात्काळ घटनास्थळी पोहोचुन जेष्ठ नागरीक यांना वेळीच मदत केल्याने त्यांचे आभार मानले आहेत.